महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग,जि.रायगड.

जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड,लिमये वाडी, अलिबाग.जि.रायगड –४०२ २०१

# GOVERNMENT MEDICAL COLLEGE, ALIBAG –RAIGAD

DISTRICT CIVIL HOSPITAL AREA, ALIBAG BEACH ROAD, LIMYEWADI, ALIBAG DIST.RAIGAD – 402 201

Email- deangmcalibag@gmail.com Phone No. 02141-299214 www.gmchalibag.in/gmch

जा.क्र.शावैमअ/वर्ग-४ /बाहयस्त्रोत ई-निविदा/ कागदपत्र पुर्तता/२१०६/२०२२ दिनांक२२.०९.२०२२

अतितात्काळ / ई-मेलव्दारे.

विषय : शासकिय वैद्यकीय महाविद्यालय अलिबाग-रायगड येथील वर्ग ४ काल्पनिक बाहयस्त्रोत ई-निविदेत आढळुन आलेल्या त्रुटींच्या कागदपत्रांची पुर्तता करणे बाबत.

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन,वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक एमईडी-२०१०/प्र.क्र.(अ)/२०१०/शिक्षण-१,मंत्रालय,मुंबई दि. ३१/०१/ २०१२.
२. कार्यालयीन आदेश जा.क्रं.शावैमअ/वर्ग-४/काल्पनिक/बाहयस्त्रोत्र/१३५३/२०२२दिनांक १४.०६.२०२२.
३.या कार्या.आदेश क्र.शावैमअ/वर्ग-४/समिती गठित/१९९७/२०२२. दि.०१/०९/२०२२.
४.दि.२२/०९/२०२२ रोजी गठित समिती बैठकीत घेण्यात आलेला निर्णय.

संदर्भ क्रं.०१ शासन निर्णयानुसार अलिबाग-रायगड येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड येथे सुरु करण्यास शासनाने मान्यता प्रदान केली होती, त्या अनुषंगाने सन २०२१-२२ करीता १०० विद्यार्थी प्रवेशीत झाले असून अभ्यासक्रम सुरळीत चालु आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वर्ग ०४ काल्पनिक /बाहयस्त्रोत्राव्दारे पदे भरण्याकरीता ई-निविदा प्रक्रिया दि.१९/०७/२०२२ ते दि. २४/०८/२०२२ मध्ये राबविण्यात आली आहे. सदर ई-निविदा दि. २५/०८/२०२२ रोजी ऑनलाईन पध्दतीने उघडण्यात आली. सदर ऑनलाईन ई-निविदेत पुरवठाधारकानी सादर केलेल्या कागदपत्रांची ( तांत्रिक बिट ) पडताळणी संस्था स्तरावरत गठित समितीने केलेली आहे.

सदरील ई-निविदेमध्ये पुरवठाधारकाने वाजवी पेक्षा जास्त् कागदपत्रे ऑनलाईन निविदेमध्ये अपलोड केलेले आहेत. सदर कागदपत्रांची गठित समिती मार्फत पडताळणी केली असता त्याममध्ये सोबत जोडल्याप्रमाणे त्रुटी आढळुन आलेल्या आहेत. तरी संदर्भ क्रमांक ४ अन्वये घेण्यात आलेल्या बैठकीत सर्वानमुतमे घेतलेल्या निर्णयान्वये त्रुटींची पुर्तता करण्यासाठी ७ दिवसाचा कालावधी देण्यात येत आहे. करीता आपणास सुचित करण्यात येते की, सोबत जोडल्या प्रमाणे आपण सादर केलेल्या ई-निवेदत खालील कागदपत्रांची त्रुटी आढळुन आल्या आहेत. तरी सदर त्रुटींची पुर्तता सोमवार, दि.०३/१०/२०२२ रोजी पर्यंत संस्थेच्या ई-मेल, हस्तपोच अथवा दि.०३/१०/२०२२ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत संस्थेस प्राप्त् होतील अश्या बेताने या कार्यालयास सादर करण्यात यावीत.

वरील कालावधीत आपण त्रुटींची पुर्तता करु न शकल्यास, छाननी अंती आपल्या निवेदत कागदपत्रांची त्रुटी आढळुन येऊन ई-निविदा प्रक्रियेतुन बाद झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. याची संबंधित ई-निविदा पुरवठाधारकानी नोंद घ्यावी.

सोबत - त्रुटींचे पत्र जोडले आहे.

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अलिबाग-रायगड

प्रति,
........................................................
........................................................